दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक ९२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.२६ जून २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com


# महाराष्ट्रात पुन्हा निर्बंध लागू

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**महाराष्ट्रात कोरोनाच्या डेल्टा प्लस व्हेरिएंटचा धोका वाढल्यामुळे पुन्हा एकदा राज्यात कडक निर्बंध लागू करण्यात आले आहेत. याबाबत राज्य सरकारने आज नवीन शासन आदेश काढला आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत कडक निर्बंध लावण्याच्या निर्णयाला सर्वानुमते संमती देण्यात आली आहे. त्यामुळे आजपासून राज्यात पुन्हा निर्बंध लागू झाले आहेत.**

या आदेशात म्हटलं आहे की, आठवड्याचा पॉझिटिव्हीटी रेट आणि ऑक्सिजन बेडची व्याप्ती बदलता तिसऱ्या स्तरावरील निर्बंध महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात लागू करण्यात आले आहेत. तिसऱ्या स्तरावरील निर्बंध आणखी कडक करायचे असल्यास स्थानिक प्रशासन त्याबाबत निर्णय घेऊ शकतं. लेव्हल ३ मध्ये अत्यावश्यक दुकानं आणि आस्थापना सर्व दिवशी दुपारी ४ वाजेपर्यंतच सुरू ठेवण्याची परवानगी आहे. तर अत्यावश्यक नसलेली दुकानं आणि आस्थापनं सोमवार ते शुक्रवार या दिवसांत ४ वाजेपर्यंत खुली ठेवू शकता.

महाराष्ट्रात कोरोनाच्या डेल्टा प्लस व्हेरिएंटचा शिरकाव झाल्यामुळे राज्य सरकारने अधिक खबरदारी घेतली आहे. डेल्टा प्लस व्हेरिएंटचे राज्यात २१ रुग्ण आढळले यातील एका ८० वर्षीय रुग्णाचा मृत्यू झाला आहे. कोरोनाच्या डेल्टा प्लस व्हेरिएंटचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी महाराष्ट्र सरकारने हे निर्बंध लागू केले आहेत. तिसऱ्या स्तरावरील निर्बंधात रेस्टॉरंट, हॉटेल्स यांना ५० टक्के क्षमतेने संध्याकाळी ४ वाजेपर्यंत खुली ठेवण्याची परवानगी आहे. विकेंड दिवशी हॉटेल सुरू राहणार नाहीत. त्यावेळी होम डिलिव्हरी करण्यास परवानगी असेल.



त्याचसोबत आरोग्य कर्मचारी आणि अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना लोकल ट्रेनने प्रवास करता येईल. जीम, सलून आणि स्पा दुकानं ५० टक्के क्षमतेने संध्याकाळी ४ वाजेपर्यंत खुली ठेवता येतील. राज्यात गुरुवारी कोविड १९ चे १० हजाराहून अधिक रुग्ण आढळले. डेल्टा प्लसचे २१ रुग्ण असून त्यातील एक दगावला. मुंबई, पालघर, सिंधुदुर्ग, जळगाव, रत्नागिरी, ठाणे याठिकाणी कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटचे रुग्ण आढळले आहेत.

कोविड-१९ चा प्रसार होणार नाही याची काळजी घेत नागरीकांना बंधने सुकर होणे सुनिश्चित करण्याबरोबरच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारी खालील विशेष कृती करू शकतील. लोकजागृतीच्या उपक्रमांद्वारे लसीकरणाचा वेग वाढवणे, पात्र लोकांपैकी किमान ७० टक्के लोकांचे लसीकरण लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सर्वो तोपरी प्रयत्न करावे. कोव्हिडचा प्रसार रोखण्यासाठी टेस्ट-ट्रॅक-ट्रीट या पद्धतीचा जास्तीत जास्त अवलंब करावा.

# व्हेल माशाच्या उलटीची तस्करी ; दोघेजण गजाआड

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

समुद्रातील तरंगते सोने म्हणून ओळख असलेल्या व्हेल माशाच्या उलटीच्या तस्करीत मुंबई पोलीस दलातील बडतर्फ केलेल्या पोलिसाचाही समावेश असल्याचे गुन्हे शाखेच्या कक्ष ३ च्या कारवाईतून उघड झाले. प्रसाद हिराचंद पिंगळे (४४) असे अटक करण्यात आलेल्या पोलिसाचे नाव असून, तो मूळचा अलिबाग तालुक्यातील कुर्डुस येथील रहिवाशी आहे. त्याच्यासह अन्य एक अलिबागच्या इसमाला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून पावणेआठ कोटींची उलटी जप्त करण्यात आली आहे.

लोअर परळ येथील सीताराम कम्पाउंडमध्ये दोघे जण व्हेल माशाच्या उलटीच्या विक्रीसाठी बुधवारी येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार, गुन्हे शाखा कक्ष ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सोपान काकड यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी निसर्ग ओतारी, प्रकाश लिंगे, सिद्धेश ज्योष्टे, पोलीस अंमलदार युवराज देशमुख, भास्कर गायकवाड, चंद्रकांत काळे, मंगेश शिंदे, राहुल पाटील यांनी तेथे कारमधून आलेल्या पिंगळेसह अमित विकास पाटील (३६) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ७ किलो ७५० ग्रॅम उलटी जप्त केली. याची किंमत पावणेआठ कोटी आहे.



दोघेही अलिबाग (कुर्डूस-सांबरी)चे रहिवासी आहेत. यातील पिंगळे हा पायधुनी पोलीस ठाण्यात पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होता. तो वैद्यकीय रजेवर गेला होता. त्यानंतर ५ वर्षे हजर झाला नाही. त्याला सेवेची गरज नसल्याचे समजून २०१६ मध्ये त्याला सेवेतून बडतर्फ केले होते. पिंगळेने मच्छीमार मंगेश नावाच्या तरुणाकडून दोन महिन्यांपूर्वी आक्षी-बेलपाडा फाटा अलिबाग येथून व्हेल माशाची उलटी विक्री करण्याकरिता घेतली होती. तिची विक्री केल्यानंतर पिंगळेने मंगेशला ४० लाख रुपये देण्याचा सौदा ठरला होता. मंगेशचा शोध सुरू आहे.

# रोटरीच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने समाजाची सेवा : आ.प्रशांत ठाकूर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोटरी क्लबच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने समाजाची जी सेवा होते, त्याबद्दल कौतुक करण्यासाठी माझ्याकडे शब्दच उरले नाहीत, असे प्रतिपादन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज(शुक्रवार, दि. २५) खांदा कॉलनी येथे रोटरी क्लबच्या कार्यक्रमात केले.

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन सिनर्जी पार्टनर्स आणि नेत्र ज्योत आय हॉस्पिटल, खांदा कॉलनी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि वैद्यकीय उपकरणांचा लोकार्पण सोहळा आमदार प्रशांत ठाकूर यांचे हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास रोटरी ३१२१ च्या डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो.रश्मी कुलकर्णी, डीआरएफसी रो. डॉक्टर गिरीश गुणे, आयकर आयुक्त संजय देशमुख, .../२

# कर्जत येथील वनाधिकारी अँन्टी करप्शनच्या जाळ्यात

**दै.रायगड नगरी । कर्जत**

रायगड जिल्ह्यातील शासकीय अधिकाऱ्यांपाठोपाठ जिल्ह्यात अजून एक अधिकारी लाचखोरी मध्ये अडकले आहे. कर्जत येथे २४ जून ला लाच घेताना श्रेणी ३ च्या वनअधिकारी अंगद विठ्ठल नागरगोजे वय ३३ वर्षे यांना अँटी करप्शन ब्युरोच्या अधिकाऱ्यांनी अटक केली आहे.

मिळालेले वृत्त असे आहे की भिशेगाव,ता. कर्जत जि. रायगड येथे राहणारे तक्रारदार यांच्या पत्नीच्या नावे असलेली कर्जत येथील जमिनीवरील झाडे तोडायची असल्याने तक्रारदार यांनी वन विभाग कर्जत येथे परवानगी मिळण्यासाठी अर्ज केला होता. तेथील लोकसेवक यांनी परवानगी न देता, तुम्ही जर झाडे तोडली तर तुमच्याविरुद्ध कठोर कारवाई करू असे सांगितले. तथापि सदरची कारवाई न करण्यासाठी आणि झाडे तोडण्याची परवानगी देण्यासाठी लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे पंधरा हजार रुपयांची मागणी केली. परंतु तक्रारदार यांनी आरोपी यांना विनंती केली की यातून काहीतरी मार्ग काढा. त्यावर आरोपी नागरगोजे यांनी तक्रारदार यांच्या सोबत पाच हजार रुपयेला तडजोड केली. या संदर्भात तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे येथे तक्रार केली.

.../२

# जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी विश्रांती कक्षाचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते उद्घाटन



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी कार्यालय हे जिल्ह्याचे सर्वोच्च कार्यालय. येथे अधिकारी-कर्मचाऱ्यांची संख्या इतर कार्यालयांपेक्षा अधिक असते. तेथील कर्मचाऱ्यांसाठी विश्रांती कक्षाची नितांत गरज होती.

त्या दृष्टीने सकारात्मक पाऊल उचलत जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी व वाहनचालकांसाठी एक विश्रांती कक्ष उपलब्ध करून दिला आहे. या विश्रांती कक्षात कर्मचारी थोडा वेळ आराम करू शकतात तसेच कार्यालयीन वेळेनंतर या ठिकाणी ते कॅरम, बुद्धिबळ यासारखे खेळही खेळू शकतात. अत्यंत नीटनेटका, आल्हाददायक असा हा विश्रांती कक्ष तयार करण्यासाठी वाहनचालक महेंद्र राजेंद्र महाडिक व त्यांच्या सहकाऱ्यांनी कष्ट घेतले व त्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (रोहयो) रविंद्र मठपती, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने, तहसिलदार सतीश कदम, अलिबाग तहसिलदार सचिन शेजाळ, राष्ट्रीय सूचना व विज्ञान केंद्राचे सहायक सूचना व विज्ञान अधिकारी श्री.निलेश लांडगे, अव्वल कारकून प्रभाकर नाईक, संजय पत्रे तसेच इतर कर्मचारी व वाहनचालक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी निधी चौधरी यांचे कर्मचाऱ्यांच्या हस्ते मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी कर्मचाऱ्यांनी या विश्रांती कक्षाचा सदुपयोग करून आपले शासकीय कामकाज अधिक क्षमतेने, उत्साहाने पार पाडावे,असे सूचित केले.

# पैशांच्या वसुलीसाठी केले भागीदाराच्याच पत्नीचे अपहरण

## आरोपी महिलेने केला पोलिस तपास अधिकारी असल्याचा बनाव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील व्यावसायिक नायर व मुके यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे. रवींद्र मुके व नायर हे दोघे भागीदारीत व्यवसाय करत होते. पैशांच्या व्यवहारावरून या दोघांमध्ये वाद निर्माण झाला. रवींद्र मुके यांचे जवळपास एक ते दीड कोटी रुपये नायर यांच्याकडे अडकल्याने मुके यांनी पैशांच्या माणीसाठी तगादा लावला होता. अखेर नायर यांच्याकडून पैसे मिळत नसल्याने रवींद्र मुके, त्यांची पत्नी रोहिणी मुके, मुलगा ध्रुव मुके व एक पूजा नामक महिला हे बुधवारी (दि.२३ जून) कामोठे येथील श्रद्धा ऍव्हेन्यू बिल्डिंगमध्ये सकाळी साडे नऊच्या सुमारास नायर यांच्या घरी गेले.

त्यावेळी नायर हे घरात उपस्थित नसल्याने त्यांच्या पत्नीकडे विचारणा केली असता नायर हे ठाणे येथे असल्याचे समजले. नायर हे पैसे देत नसल्याने आरोपी मुके यांच्यासोबत असलेल्या अनोळखी महिलेने इन्वेस्टीगेशन ऑफिसर असल्याचा बनाव करून तिने नायर यांच्या पत्नीला हाताने व चामडी पट्ट्याने मारहाण केली. त्याचबरोबर बेड्या घालून रबाळे पोलीस स्टेशनला नेईन अशी धमकी देत तिला फरफटत खेचत नेऊन लाल रंगाच्या मारुती स्विफ्ट कारमध्ये बसवून अपहरण केले. सदर अनोळखी महिलेने पोलीस असल्याचा बनाव केल्याने शेजारीपाजारी देखील त्यावेळी पुढे आले नाही. आरोपींनी नायर यांच्या पत्नीला ऐरोली येथील घरी नेले होते. व आपले पैसे दिल्याशिवाय नायर यांच्या पत्नीला जाऊ देणार नाही असे फोनवरून धमकावले होते.

सदरची माहिती कामोठे पोलिसांना मिळताच कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अपहरण झालेल्या महिलेचा शोध घेण्यास सुरुवात केली व अत्यंत कमी वेळातच कामोठे पोलिसांनी अपहरण झालेल्या नायर यांच्या पत्नीची सुटका केली. या गुन्ह्यातील आरोपी हे फरार असून त्यांचा शोध कामोठे पोलिसांकडून केला जात आहे.



# धोका 'डेल्टा प्लस'चा

करोना साथरोगाची तिसरी लाट येणार आणि सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये दैनंदिन रुग्णसंख्या पाच लाखांच्या घरात जाईल, हा अभ्यासकांचा इशारा गांभीर्याने घेत प्रशासनाने सज्ज राहण्याची आवश्यकता आहे. करोनाची पहिली लाट ओसरल्यानंतर शास्त्रज्ञांनी दुसऱ्या लाटेबद्दल दिलेल्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केल्याची मोठी किंमत संपूर्ण देशाला मोजावी लागली आहे. दुसरी लाट पहिल्या लाटेपेक्षा तीव्र होती; परिणामी अतिशय वेगाने संसर्ग वाढत गेला. रुग्णालयांतील खाटा, ऑक्सिजन, औषधे, इंजेक्शन या साऱ्यांबाबत यंत्रणा कमी पडल्या. नव्या विषाणूचे वर्तन, साथरोगाचा कालावधी, रुग्णालय सज्जता, लसीकरण या साऱ्यांबाबत प्रशासनाचे आकलन अतिशय तोकडे ठरले. कसलीही तयारी न करता फक्त लॉकडाउनचा मंत्र सरकारे जपत राहिली. त्यामुळे उपचारांअभावी मृत्युमुखी पडणाऱ्यांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली. एप्रिल आणि मे महिन्यांतील देशातील स्थिती एखाद्या दु:स्वप्नापेक्षाही भयावह होते. या स्थितीत आता सुधारणा होत आहे. मे महिन्यात चार लाखांच्या घरात असलेली देशातील दैनंदिन रुग्णसंख्या आता पन्नास हजारांच्या आत आहे. चाचणी केलेल्यांत संसर्ग असलेल्यांचे देशातील प्रमाण (पॉझिटिव्हिटी रेट) तीन टक्क्यांच्या आत आले आहे. दैनंदिन मृत्युसंख्याही कमी होत आहे. पुणे, मुंबईसह अनेक ठिकाणी जम्बो रुग्णालये ओस पडू लागली आहेत; त्यामुळे ती बंदही केली जात आहेत. टप्प्याटप्प्याने निर्बंध शिथिल केले जात असून, व्यवहार पूर्ववत होऊ लागले आहेत. या पार्श्वभूमीवर तिसऱ्या लाटेचा इशारा आला आहे. यापूर्वी केलेल्या चुका टाळल्या आणि रुग्णालये, ऑक्सिजन, औषधे, इंजेक्शन आदींबाबत तयारी केल्यास तिसऱ्या लाटेची तीव्रता कमी होऊ शकेल. गेल्या वर्षी करोनाची साथ सुरू झाल्यानंतर काही दिवसांतच 'करोनासह जगणे हीच नवसाधारण स्थिती' असल्याचे बोलले जात होते. साथरोगातही आपले व्यवसाय, उद्योग, व्यापार चालू ठेवणे एवढ्यापुरताच या 'नवसाधारण स्थिती'चा अर्थ आपल्याकडे घेतला गेला. बहुतेक देशांत मात्र प्रतिबंधक आणि उपचारात्मक उपायांवर भर देत आपले उद्योग-व्यवसाय सुरू ठेवण्याला 'नवसाधारण स्थिती' मानली गेली. त्यामुळे या देशांत लसीकरणावर भर दिला गेला. 'लस नाही, तोपर्यंत कोणीही सुरक्षित नाही,' हे ओळखून लसीकरणाचे धोरण आखले गेले. देशातील संपूर्ण लोकसंख्येचे लसीकरण होईल अशा पद्धतीने लशींची आगाऊ नोंदणी केली गेली. भारतात मात्र याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. १३५ कोटी लोकसंख्येचा वारंवार उल्लेख केला जात असला, तरी लसीकरणाच्या पहिल्या टप्प्यात केवळ तीस कोटी लोकसंख्येच्या लसीकरणाचाच विचार केला गेला. लसीमुळे करोनामृत्यू टाळता येत असल्याचे संशोधन आहे. भारतातील एप्रिल-मे महिन्यातील करोनामृत्यूंची वाढलेली संख्या आणि न झालेले लसीकरण यांचा थेट संबंध आहे. वेळीच लसींचा साठा मिळविला असता आणि देशव्यापी मोहीम आखली गेली असती, तर मृत्यूंचे प्रमाण नक्कीच कमी झाले असते. ही बाब लक्षात आल्यानंतर लसीकरणाचे धोरण बदलले गेले; तरीही 'कोव्हिशील्ड'च्या दोन मात्रांतील अंतर १८ ते ४५ या वयोगटाचे लसीकरण यांबाबत धोरणात्मक संभ्रम निर्माण आहेच. तो अद्याप दूर झाला नसला, तरी लसीकरणाचा दुसरा टप्पा सुरू करण्यात आला असून, सोमवारी पहिल्याच दिवशी ८८ लाख लोकांचे लसीकरण केले गेले. हा वेग चांगला असला, तरी तो कायम ठेवण्याचे आव्हान आहे. ते न पेलल्यास तिसऱ्या लाटेची तीव्रता वाढू शकते. कानपूर येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'च्या अभ्यासकांनी तिसऱ्या लाटेबद्दल तीन शक्यता वर्तविल्या आहेत. १५ जुलैपासून देशातील लॉकडाउन पूर्णत: उठवले आणि लोक मोठ्या संख्येने घराबाहेर पडल्यास सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये दैनंदिन रुग्णसंख्येचे नवे शिखर गाठले जाईल, अशी भीती त्यांनी वर्तविली आहे. योग्य काळजी न घेतल्यास ही लाट दुसऱ्या लाटेहूनही तीव्र असेल, असे त्यांचे म्हणणे आहे. हा त्यांचा इशारा आणि भारतातच सापडलेला करोनाच्या डेल्टा या विषाणूचे 'डेल्टा प्लस' हे नवे रूप या दोन्ही बाबी चिंता वाढविणाऱ्या आहेत. करोनाच्या प्रतिपिंडांना 'डेल्टा प्लस' जुमानत नसल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे. तिसऱ्या लाटेत या विषाणूचा संसर्ग झाल्यास ती भयंकर ठरू शकते. या विषाणूबाबत शास्त्रज्ञ अभ्यास करतीलच; परंतु सरकार आणि सर्वसामान्यांना सज्ज राहावे लागेल. जम्बो रुग्णालये आता ओस असली, तरी ती केव्हाही सुरू करता येईल, याची खबरदारी घ्यावी लागेल. ऑक्सिजनयुक्त खाटा, अतिदक्षता विभागांतील खाटा, औषधे, इंजेक्शन या सर्व गोष्टी मुबलक राहतील हे पाहावे लागेल. लसीकरणाचा वेग वाढवावा लागेल. सर्वसामान्यांनाही मास्क-सॅनिटायझर-सुरक्षित वावर ही काळजी घ्यावी लागेल. निर्बंध शिथिल झाल्यानंतर बहुतेक ठिकाणी होत असलेल्या गर्दीत सुरक्षित वावराचा फज्जा उडतो आहे. हे चित्र न बदलल्यास आणि सज्ज न राहिल्यास तिसरी लाटही दु:स्वप्न ठरण्याचा धोका आहे.

# मतदार यादीत नाव नोंदणी, दुरुस्ती दुबार, नाव वगळणी करुन घेण्यासाठी तहसील कार्यालय पनवेल यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारत निवडणूक आयोगाने १ जानेवारी २०२१ या अर्हता दिनांकावर आधारीत राज्यातील सर्व विधानसभा मतरसंघाच्या छायाचित्र मतदार यादीचा संक्षिप्त पुन:रिक्षण कार्यक्रम जाहिर केला आहे. या कार्यक्रमांतर्गत १०० टक्के शुध्द मतदार यादी तयार करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. मतदारांनी मतदार यादी शुध्द करण्यासाठी नाव नोंदणी, दुरुस्ती दुबार नाव वगळणी करुन घेण्यासाठी संबंधीत मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बी.ए.ल ओ.) तहसिल कार्यालय किंवा मतदार नोंदणी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

१८८ पनवेल विधानसभा मतदारसंघात एकूण ५७० मतदार यादीभाग आहेत. त्यापैकी २५७ यादीभागातील ४४ हजार ११२ मतदारांचे फोटो मतदार यादीत नसल्याचे आढळून आले आहे. तसेच १९० उरण विधानसभा मतदारसंघातील तालुका पनवेल अंतर्गत १२४ यादी भाग असुन त्यामध्ये २ हजार २२ मतदारांचे फोटो मतदार यादीत नसल्याचे आढळून आले आहे.

ज्या मतदारांचे रंगीत छायाचित्र मतदार यादीत नाही. अशा मतदारांनी आपले रंगीत फोटो ३० जुन पर्यंत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी / तलाठी किंवा निवडणुक शाखा तहसिलदार कार्यालय, पनवेल कार्यालयात जमा केले नाहीत तर मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात येतील.

१६ जानेवारी २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये नागरिकांनी त्यांच्या मतदारसंघाच्या मतदार यादीत त्यांच्या नावासमोर फोटो आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी. मतदार यादीत फोटो नसल्यास तात्काळ आपला अद्यावत कलर (रंगीत ) पासपोर्ट साईज फोटो संबंधित बीएलओ, तलाठी किंवा निवडणुक शाखा तहसिल कार्यालय पनवेल, कार्यालयात जमा करावेत अन्यथा अशा मतदारांची नावे मतदार यादीतुन वगळण्यात येणार आहेत. नागरिकांनी मतदार यादी मध्ये नाव नोंदणी, दुरुस्ती अथवा वगळणी बाबत त्यांचे यादीभागीशी संबंधित बि.एल.ओ., तलाठी किंवा निवडणुक शाखा तहसिलदार कार्यालय पनवेल या कार्यालयाशी अथवा raigad.nic.in या संकेतस्थळास कृपया भेट देण्याचे आवाहन विजय तळेकर सह. मतदार नोंदणी अधिकारी (१८८ पनवेल/ १९० उरण विधानसभा मतदार संघ) तथा तहसिलदार पनवेल यांनी केले आहे.

# जनशिक्षण संस्थानच्या महिला स्वावलंबन प्रशिक्षणाचे पोलादपूर तालुक्यात पर्व सुरू

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**




जनशिक्षण संस्थान अलिबागमार्फत पोलादपूर तालुक्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिलांना आत्मनिर्भर तसेच स्वावलंबनासाठी विविध अभ्यासक्रम आणि प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येऊन पुरूषांच्या बरोबरीने संसाराचा गाडा चालविण्याची ताकद देण्याचे काम गावोगाव प्रशिक्षण वर्ग सुरु करून केले जाईल, अशी माहिती ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांनी जाकमातानगर येथील प्रशिक्षण वर्गाच्या शुभारंभप्रसंगी दिली.

याप्रसंगी जनशिक्षण संस्थान रायगड अलिबागचे संचालक विजय हिरामण कोकणे, माजी उपनगराध्यक्ष उमेश पवार, कार्यक्रम सहायक सुकन्या सचिन नांदगांवकर, कार्यक्रम सहायक हिमांशू अविनाश भालकर आदी उपस्थित होते. यावेळी ३ महिने कालावधीचा शिवणकला प्रशिक्षण (अँपलीक्यू आर्टीसन) प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ ज्येष्ठ पत्रकार पालकर यांच्याहस्ते प्रशिक्षिका अस्मिता उमेश पवार यांना अधिकृत नियुक्तीसह ओळ-खपत्र प्रदान करून करण्यात आला. याप्रसंगी लिक्विड हँडवॉश व सॅनिटायसिंग स्प्रे याबाबत महिलांना मोफत प्रशिक्षण देण्यात आले.

यावेळी संचालक विजय कोकणे यांनी कोरोनाजन्य परिस्थितीवर मात करण्याच्या दृष्टीने सर्व प्रकारची काळजी घेऊन तसेच नियम पळून व सोशल डिस्टंसिंग घेऊन शिवण क्लास सुरू राहणार असून महिलांनी अधिकाधिक सहभाग दर्शवित येत्या काळात गावोगावी हे शिवण क्लासेस सुरू राहण्यासंदर्भात प्रचार व प्रसार करण्याचे आवाहन केले. शेवटी माजी नगराध्यक्ष उमेश पवार यांनी सर्व उपस्थितांना जनशिक्षण संस्थानचे विविध अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# विजेच्या लपंडावाने उरण पूर्व विभागातील जनता हैराण

**दै.रायगड नगरी । उरण**

पावसाळा नियतमित सुरू झाला असला तरी उरण तालुक्यातील विजेचा खेळखंडोबा सातत्याने सुरू आहे.पावसाची सर येताच वीज गायब होणे हे दररोजचे झाले असल्याने उरण पूर्व विभागातील जनता हैराण झाली आहे. याबाबत उरणच्या एम एस ई बी कार्यालयात वारंवार तक्रार करूनही तेथिल अधिकारी जनतेच्या समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे.

उरण तालुक्यात बोकडविरा येथिल गॅस टर्बाईन पॉवर स्टेशन मध्ये वीज निर्मिती केली जाते.मात्र ग्रामीण भागातील जनतेला अजूनही सातत्याने अंधारात रहावे लागते. उरण पूर्व विभागातील सुमारे ३० गावांना वीज गायब होण्याचा फटका दररोज सहन करावा लागत आहे. पावसाने सातत्य दाखविले असले तरी वीज मंडळाने जनतेला अखंडित वीज देण्यात सातत्य न दाखवता दररोज किमान सहा वेळा वीज खंडित ठेवण्याचे सातत्य आजमितीस कायम राखले आहे.

सतत वीज खंडित होत असल्याचा फटका सध्या ऑनलाईन अभ्यास करणारे विद्यार्थी व वर्क फ्रॉम होम काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसत असून त्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे.गावात वीज असणे म्हणजे उत्सव असल्यासारखे जनतेला वाटत आहे.पावसाळ्यात वीज जाऊ नये म्हणून दुरुस्तीची करावी लागणारी कामे वीज मंडळाच्या ठेकेदाराने पूर्ण केली नसल्याने उरण पूर्व विभागातील विजेचा खेळखंडोबा कायम असल्याचे दिसून येत आहे.

जनतेकडून दर महिन्याला वीज बिल वसूल करूनही जनतेला अखंडित वीज मिळत नसल्याने जनतेत संतापाची भावना व्यक्त होत आहे. उरण पूर्व विभागाला वीज वाहून नेणारी इलेक्ट्रिक केबल भेंडखळ खाडीत ब्रेक होत असल्याचे एकमेव कारण वीज मंडळाचे अधिकारी नेहमी देत असतात मात्र त्याची कायमची दुरुस्ती का केली जात नाही असा सवाल जनता विचारीत आहे.

# पालीतील रस्त्यावर खड्ड्यांचे विघ्न, रस्त्याला तळ्याचे स्वरूप

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

अष्टविनायकाचे प्रख्यात धार्मिक स्थळ असलेल्या स्थान असलेल्या बल्लाळेश्वराच्या पालीत रस्त्यांची पुरती दुरवस्था झाली आहे. गावातील मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्त्यावर ठिकठिकाणी भले मोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात या खड्ड्यांमधून मार्ग काढणे जोखमीचे झाले आहे. यामुळे नागरिकांसह वाहनचालक पुरते मेटाकुटीला आले आहेत. दरवर्षी पावसाळ्यात रस्त्याची चाळणं होते, मात्र यावर ठोस उपाय होत नाही.

येथील स्टेट बँक पासून गांधी चौक, महावीर मार्ग ते थेट गणेश मंदिरापर्यंतच्या रस्त्याची दुर्दशा झाली आहे. आगरआळी, सावंतआळी, रामआळी ते मधल्या आळी पर्यंतचा रस्ता, भोई आळी, मिनिडोअर स्टँड ते बसस्थानक रस्त्याची भल्या मोठ्या खड्ड्यांनी अक्षरशः चाळण झाली आहे. त्याचबरोबर बल्लाळेश्वर नगर, धुंडीविनायक नगर व शिळोशी आणि मढाळी गावाकडे जाणारा रस्ता प्रचंड फुटला आहे. पावसाचे पाणी या खड्ड्यात साठल्याने वाहन चालकास खड्ड्याचा अंदाज येत नाही. परिणामी वाहन जोरात खड्ड्यात आदळते. त्यामुळे पाणी व चिखल पादाऱ्यांच्या अंगावर उडते. खड्ड्यातील बारीक खडी पसरल्याने वाहने घसरतात. दुचाकीस्वारांना चालतांना कसरत करावी लागते. पादचाऱ्यांना येथून मार्ग काढतांना अडचणी येतात. महिला व वृद्धांची तर खूपच गैरसोय होते. त्यांचा अनेक वेळा तोल जातो. प्रत्येकजण या खराब रस्त्याबद्दल संताप व्यक्त करत आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत तीचे मालक कै.शंकर भाऊ कदम यांचे वारस सिताबाई शंकर कदम, रमाकांत शंकर कदम, संगीता रवींद्र साकरे, अंकिता अविनाश बामणे, जनार्दन रामचंद्र कदम यांच्याकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जुई, ता.उरण, जि.रायगड**

| धारकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| सिताबाई शंकर कदम, रमाकांत शंकर कदम, संगीता रवींद्र साकरे, अंकिता अविनाश बामणे, जनार्दन रामचंद्र कदम | १५१ | २ | ०-४५-२५<br>पो.ख.०-६८-५०<br>एकूण १-१३-७५<br>पैकी ०-२८-५० | ०३-५२ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, गहाणखत, वहिवारंग, वहिवाट, किवकिवडा, हक्कहितसंबंध वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून सदरचा कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.२६/०६/२०२१
स्थळ : उरण

**सही/-**
**ॲड.योगेश नामदेव म्हात्रे**
**रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.८०९७१०८०६०**

पृष्ठ क्र.१ वरुन...

# रोटरीच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने समाजाची सेवा : आ.प्रशांत ठाकूर

नगरसेवक एकनाथ गायकवाड, नगरसेविका सीता पाटील, क्लब अध्यक्ष हार्मेश तन्ना, सचिव कल्पेश परमार, प्रोजेक्ट संपर्क डॉक्टर एन. सी.जनार्दन, नेत्रज्योत आय हॉस्पिटलचे ट्रस्टी, डॉक्टर, इतर क्लबचे अध्यक्ष व रोटेरियन उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपण या क्लबचे सदस्य असल्याचा मला अभिमान वाटत असून त्याच्या कार्याचे कौतुक करण्यासाठी आणि त्यांच्या कडून आम्हा राजकारण्यांना घेण्यासारख्या स्फूर्तिदायक कितीतरी गोष्टी आहेत हे सांगण्यासाठी आता माझ्याकडे शब्दच नाहीत, असे म्हंटले. या प्रोजेक्टसाठी मोतीबिंदूचे रुग्ण शोधण्यासाठी ग्रामीण भागात, आदिवासी किवा शहरातील गरीब वस्तीत जाऊन काम करावे लागेल. कारण या अशा व्यक्ति तपासणीसाठी वेळ काढू शकणार नाहीत आणि त्यांना हा खर्च करणे परवडणार नाही अशी भीती वाटते . त्यामुळे ते दुखणी अंगावर काढत असतात अशा लोकांपर्यंत पोहचावे लागणार आहे. त्यासाठी एखादी योजना करणे आवश्यक असल्याचे सांगून त्यांनी रोटरीने प्रोजेक्ट हातात घेतला की तो पूर्ण करते. या प्रोजेक्टला मिळालेली ग्लोबल ग्रँट ही तुमच्या केलेल्या कामाला मिळालेली दाद असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले आणि रोटरीच्या माध्यमातून सातत्याने समाजसेवा केली जात असल्याचे अधोरेखित केले. यावेळी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. रश्मी कुलकर्णी, डीआरएफसी रो. डॉक्टर गिरीश गुणे, आयकर आयुक्त संजय देशमुख यांनी ही यावेळी आपले अनुभव सांगितले व शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. प्रमोद गांधी यांनी या प्रोजेक्ट संदर्भात सविस्तर माहिती दिली.

# कर्जत येथील वनाधिकारी ॲन्टी करप्शनच्या जाळ्यात

याबाबत तक्रार आल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिस निरीक्षक सुषमा पाटील यांनी सापळा रचला आणि तक्रारदार यांच्याकडून चार हजार रुपये लाच घेताना आरोपी नागरगोजे यांच्यावर झडप घातली. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस निरीक्षक सुषमा पाटील यांच्या पथकाने केली. या पथकात पाटील यांच्यासोबत पोलीस हवालदार महाले, शेख, गीते, पोलीस नाईक खाबडे, पोलीस शिपाई पारधी यांचा समावेश होता. आरोपीला आज २५ जून रोजी मा. पनवेल न्यायालयात हजर करण्यात आले होते. पुढील तपासासाठी आरोपीला न्यायालयाने एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक सुषमा पाटील या करत आहेत.

इंदलकर सो.
ॲड.राजकुमार वि.जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज ६४८/२०२१
नि.नं.७
ने.ता.२९/०७/२०२१

श्री.राजू चंदर उर्फ रामचंद्र ठाकूर — अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत न्हावे
मा.ग्रामविकास अधिकारी
मौजे : न्हावेखाडी, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै. चंदर उर्फ रामचंद्र गोपाळ ठाकूर हे अर्जदार यांचे नात्याने वडील असून ते दि.३०/०६/१९८० रोजी मौजे : न्हावेखाडी, ता.पनवेल, जि.रायगड येथील रहिवाशी असून ते दिनांक रोजी राहत्या घरी मयत झाले आहेत. त्याअर्थी श्री.राजू चंदर उर्फ रामचंद्र ठाकूर यांनी जन्म मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये कै.चंदर उर्फ रामचंद्र गोपाळ ठाकूर यांच्या मृत्यूची नोंद करून मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

सदरकामी कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.न्यायालय वरील अर्जदार यांच्या अर्जाकामी पुरावा घेण्याची जन्म मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये कै.चंदर उर्फ रामचंद्र गोपाळ ठाकूर यांच्या मृत्यूची उशिरा नोंद करून मिळणेबाबतचा दाखल केलेला अर्ज मंजूर करतील.

आज दि.२५/०६/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

राव साहेब
ॲड.पि.एस.संगारे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.७३१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०७/२०२१

श्री.संदीप ओमप्रकाश जैसवाल उर्फ चौधरी — अर्जदार
विरुद्ध
१) श्री.ओमप्रकाश गंगाप्रसाद जैसवाल वगैरे
२) श्रीमती.सारिका विजयकांत जैसवाल
३) श्रीमती.सुलेखा रविकुमार जैसवाल
४) श्रीमती.सुनैना सुर्यकांत जाधव — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, श्रीमती. लिला ओमप्रकाश जैसवाल उर्फ चौधरी, रा.१००३, विवांत, लोधा स्प्लेंडोरा जी.बी.रोड, ठाणे प.यांचे दि.०३/०२/२०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे नावे व मालकी असलेली खालील वर्णनाची मिळकत होती.

**मिळकतीचा तपशिल**
**१ बी.एच.के.फ्लॅट नं.१५०१, १५ वा मजला, टॉवर बी-३३, क्षेत्रफळ ५१९ चौ.फूट (कारपेट) अंदाजे, सोबत एक कार पार्कींग, इंडिया बुल्स ग्रीन्स, होन्डा वेअरहाऊसच्या बाजूला, कोन गाव, ता.पनवेल, जि.रायगड, पिनकोड-४१०२०७**
**मुल्यांकन : २२,००,०००/- (मिळकतीचा ५०% हिस्सा)**

वरील अर्जदार यांनी मे.कोर्टात ते श्रीमती.लिला ओमप्रकाश जैसवाल उर्फ चौधरी यांचे वारस असल्याबद्दलचा वारस दाखला मिळकविण्याकरिता अर्ज केलेला आहे. अर्जदार हे श्रीमती.लिला ओमप्रकाश जैसवाल उर्फ चौधरी, रा.१००३, विवांत, लोधा स्प्लेंडोरा जी.बी.रोड, ठाणे प. यांचे कायदेशीर वारस आहेत. त्या हक्काबद्दल कोणा व्यक्तीस हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी ही नोटीस वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत योग्य त्या कागदपत्र पुराव्यासहीत मे.कोर्टाकडे घेतल्या नाहीत तर हे कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल व ते श्रीमती.लिला ओमप्रकाश जैसवाल उर्फ चौधरी यांचे कायदेशीर वारस आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करण्यात येईल.

आज दि.२५ माहे ०६/२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांकडून कायमची विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, बयाणापावती, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमूद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास सदरच्या मिळकतीत कोणाचाही कुठलाही हक्कहितसंबंध नसून वा असल्यास तो कायमचा सोडून दिला आहे असे समजून माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या बिनशेती जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे : नालधे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चौ.मी. | रुपये | पैसे |
| कॅप्टन राजिंदरसिंह पिंकी सिंह | ७८ | १५ | ४०६ | ४० | ६० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**कार्यालयीन पत्ता : मु.पो.कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१**

**सही/-**
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
**(ॲडव्होकेट)**
**दिनांक : २६/०६/२०२१**
**मो.नं.९१५८२७७७२८**

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.८८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०७/२०२१

१) श्री.हसुराम आत्माराम कोळी
वय : वर्षे, शेती
रा.३८४, कोळीवाडा, मु.पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
२) श्री.प्रतिक हसुराम कोळी
वय : २७ वर्षे, नोकरी
रा.३८४, कोळीवाडा, मु.पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
३) सौ.पुनम विकास वैती
(लग्नापूर्वीची पुनम हसुराम कोळी)
वय : ३३ वर्षे, गृहिणी
रा.घर नं.८०८, एम.जी.रोड, पनवेल,
महाराष्ट्र हॉटेल जवळ, मोमीनपाडा, पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार यांचे मयत आई/पत्नी कै.रतन हसुराम कोळी ह्यांचे दि.२१/०१/२०२१ रोजी मु.पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले. अर्जदार श्री.हसुराम आत्माराम कोळी, श्री.प्रतिक हसुराम कोळी, सौ. पुनम विकास वैती (लग्नापूर्वीची पुनम हसुराम कोळी) यांनी कै.जिजाबाई दत्तात्रय भोईर ह्यांचे सदरचा वारसदाखला हा भविष्यात/आवश्यकता लागल्यास केवळ गरजेचे असल्याने सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

वरील अर्जदार वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२२ माहे जून २०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/- क.लिपीक दि.न्या.उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.उरण

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# दोन वर्षानंतर मिळाली सफाई कामगारांना हक्काची रक्कम : नगरसेवक शिवाजी शिंदेंच्या प्रयत्नांना यश



**दै.रायगड नगरी । माथेरान**

आपल्या कष्टाने, मेहनतीने समाजातील इतर लोकांचे जिवन सुखमय बनविणाऱ्या सफाई कामगारांना आपल्या हक्काची रक्कम मिळणेही खरोखरच स्वाभाविक आनंदाची बाब आहे. परंतु त्यासाठी अनेकांचे दरवाजे ठोठावे लागणे म्हणजे एकप्रकारची या सफाई कामगारांची अवहेलना म्हणावी लागेल. माथेरान सारख्या डोंगर दर्यातील गावात नगरपरिषदेच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापनाच्या तत्कालीन ठेकेदाराने मागील दोन वर्षांपूर्वी येथील आशा गायकवाड आणि माथेरानच्या पायथ्याशी राहणारे आदिवासी बांधव मनोहर पारधी या दोन कष्टकरी सफाई कामगारांची पीएफ ची रक्कम अदा केली नव्हती. ठेकेदाराने ठेका सोडून गेल्यावर सुध्दा सदरची रक्कम या कामगारांना मिळाली नाही.

याबाबत त्यांनी संबंधित अधिकारी वर्ग त्याचप्रमाणे ठेकेदाराला सातत्याने विनवण्या करून देखील काहीच साध्य झाले नाही त्यामुळे या दोघांनी स्वच्छता विभागाचे अधिकारी त्याचप्रमाणे, तत्कालीन मुख्याधिकारी यांना विनंत्या केल्या होत्या. गावातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या मंडळींना सर्व हकीकत कथन केली होती परंतु त्यास कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळाला नाही. अखेरीस सामाजिक बांधिलकी जपणारे, राजकारणा व्यतिरिक्त समाजकारणाला अधिकाधिक महत्व देणारे काँग्रेस पक्षाचे खंबीर उमदे कार्यकर्ते नगरसेवक शिवाजी शिंदे यांच्याकडे मनोहर पारधी आणि आशा गायकवाड यांनी याबाबत सविस्तर चर्चा केल्यानंतर शिवाजी शिंदे यांनी सातत्याने संबंधीत ठेकेदाराकडे या श्रमिकांच्या हक्काच्या रक्कमेबाबत पाठपुरावा केला होता चार ते पाच महिने विचारून सुध्दा त्या ठेकेदाराने काहीएक प्रतिसाद दिला नाही त्यामुळे आपल्या स्टाईलने शिवाजी शिंदेंनी ठेकेदारास सूनावल्यावर आज दि.२५ जून रोजी पारधी आणि गायकवाड यांची पीएफची रक्कम दोघांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे.प्रत्येकी बारा हजार रुपयांची रक्कम ही सध्याच्या कोरोनाच्या कठीण परिस्थितीत खूपच महत्वाची असल्याने या दोन्हीही कामगारांना अश्रू अनावर झाले शिवाजी शिंदेंनी केलेल्या प्रयत्नांमुळे त्यांना त्यांच्या हक्काची रक्कम मिळाल्यामुळे त्यांनी पेढे वाटून आनंद साजरा केला.

मी सफाई कामगारांच्या कोणत्याही युनियन मध्ये नाही. जवळजवळ दोन वर्षे आमचे पीएफ चे पैसे ठेकेदारांनी दिले नाहीत. नेहमी आज देतो उद्या देतो करत त्यांनी दोन वर्षे आम्हाला ताटकळत ठेवले होते. याबाबत आम्ही जे जे अधिकारी संबंधित आहेत त्यांना विनंत्या केल्या होत्या. फक्त पाया पडण्याचे बाकी राहिले होते. परंतु आमच्या हाकेला नगरसेवक शिवाजी शिंदे, मनोज खेडकर धावून आले. शिवाजी शिंदेनी जर का त्या ठेकेदाराला आपल्या पद्धतीने सांगितले नसते तर कदाचित आमचे हक्काचे पीएफ चे पैसे आम्हाला गमवावे लागले असते. त्यामुळे आम्ही शिवाजी शिंदेंचे खूप आभारी आहोत.

**: आशा गायकवाड, सफाई कामगार**

आमच्या कष्टाच्या पैशाबाबत अनेकांना आम्ही सांगून सांगून अक्षरशः वैतागून गेलो होतो. एकही अधिकारी नाही की ज्याला आम्ही आमच्या या अडचणी बाबतीत सांगितले नसेल पण काहीच उपयोग झाला नाही. नगरसेवक शिवाजी शिंदे हे देवासारखे भेटले म्हणून तरी मला अडचणीच्या वेळेस ठेकेदाराकडून बारा हजार रुपयांची माझी कष्टाची रक्कम मिळाली आहे.

**: मनोहर पारधी, सफाई कामगार**

# खुरावले फाट्यावरील पेट्रोल पंप २४ तास सुरू ठेवण्याचे तहसीलदारांचे आदेश

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**



सुधागड तालुक्यातील खुरावले येथील पेट्रोल पंप शासन नियमानुसार २४ तास सुरू ठेवण्यात यावे असे आदेश पाली-सुधागड तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी तातडीने दिले आहेत. खुरावले येथील पेट्रोल पंप नागरिकांच्या सोयीसाठी २४ तास सुरू ठेवण्यात यावे अशी मागणी सुधागड तालुका वंचीत बहुजन आघाडीतर्फे करण्यात आली होती. या मागणीची लागलीच दखल हे आदेश दिले गेल्याने वंचीत बहुजन आघाडीच्या मागणीला यश आले आहे. त्यांनी पाली तहसीलदार दिलीप रायन्नावार यांचे जनतेच्या वतीने आभार मानले आहेत.

हे पेट्रोल पंप रात्री आठ वाजता बंद होत होते. यामुळे येथील पंचक्रोशीतील नागरिकांना तसेच पाली खोपोली रस्त्यावरील वाहतूकदारांची रात्री-अपरात्री पेट्रोल अभावी गैरसोय होत होती. मात्र आता त्यांना दिलासा मिळाला आहे. तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी तातडीने वंचित बहुजन आघाडीच्या निवेदनाची दखल घेतल्यामुळे त्यांचे सुधागड तालुका वंचित बहुजन आघाडी च्या वतीने तालुका अध्यक्ष अमित गायकवाड यांनी आभार मानले. यावेळी अमित गायकवाड व युवा कार्यकर्ते क्रांती कदम उपस्थित होते.

# आर्या वनौषधीचा वटपौर्णिमा व आयुर्वेद जनजागृती कार्यक्रम



**दै.रायगड नगरी । पनवेल**

वटपौर्णिमेला वटवृक्षाची रोपं लावून व वाटप करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचा छोटा प्रयत्न आर्या वनौषधी संस्थेच्यावतीने करण्यात आला. वटपौर्णिमेचे औचित्य साधून या वेळी वटपौर्णिमा व आयुर्वेद या विषयावर जनजागृती कार्यक्रमही घेण्यात आला. सदर कार्यक्रमात आर्या प्रहरचे प्रतिनिधी दत्तू कोल्हे यांच्या हस्ते वडाचे औषधी गुणधर्म व उपयोग या बद्दल माहिती असलेली पत्रके महिलांना व नागरिकांना वाटप करण्यात आली.

निसर्गताच दीर्घायुषी व धार्मिक महत्व असणाऱ्या वड या वृक्षाचे संवर्धन व जतन व्हावे या हेतूने सदर कार्यक्रम घेण्यात आला. असे संस्थेचे अध्यक्ष व आर्या प्रहरचे संपादक प्रा.सुधीर पाटील यांनी यावेळी सांगितले. पर्यावरणाच्या दृष्टीने वडवृक्षाचे महत्त्व खूपच आहे. वड हा मानवासाठीही खूपच उपयुक्त आहे. या वृक्षांची पाने, फळे, चीक, मुळ औषधात वापरतात. मूत्राघात, श्वेतप्रदर, प्रमेह, मेदवृद्धी, विर्यविकार, जंत, वंध्यत्व, अतिसार, आमांश, व्रण, मूळव्याध, नेत्रविकार, केसविकार, संधिवात आदी अनेक विकारावर वड उपयुक्त आहे असेही सुधीर पाटील यांनी यावेळी सांगितले. वटपौर्णिमेला वड या वृक्षांची तोड न करण्याचे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात आले होते या आवाहनाला खूपच चांगला प्रतिसाद मिळाला असेही सुधीर पाटील यांनी या वेळी सांगितले.

# आपण जगता जगता दुसऱ्यासाठी जगणे हा जीवनातील वेगळा आनंद : मिनार चिले

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

आपण जगता जगता दुसऱ्यासाठी जगणे हा जीवनातील वेगळा आनंद असल्याचे प्रतिपादन बारशिव येथील मिनार मनोहर चिले यांनी मुरुड तालुक्यातील भोईघर ग्रामपंचायत हद्दीतील टेंभोर्डे येथील आदिवासी वाडी येथे जीवनावश्यक वस्तू व धान्य वाटप प्रसंगी केले.

दि.२२ मार्च २०२० पासून कोरोना महामारी मुळे स्थानिक मोलमजुरी करणाऱ्या ग्रामस्थांच्या हातचा रोजगार गेला असल्याने त्यांची परिस्थिती हलाखीची झाली आहे आणि त्यातच झालेल्या निसर्ग आणि तौक्ते चक्रिवादळामुळे ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक तसेच निवाऱ्याचे नुकसान झाले आहे.त्यामुळे काहीजणांच्या घरात एक वेळ अन्न शिजणे मुश्किल झाले.त्यांना गावातील युवकांनी मदत करण्याचे ठरविले.आम्ही केलेली मदत म्हणजे तुटपुंजी आहे. आज जी मदत करण्यात आली आहे त्यामध्ये सर्व समाजातील गरजू व्यक्तीपर्यंत मदत पोहचविण्याचा प्रामाणिक हेतू आहे.यापुढेसुद्धा आम्हाला जितके शक्य होईल तितकी मदत करू. असा मानस मिनार मनोहर चिले यांनी यावेळी व्यक्त केला. भोईघर ग्रामपंचायतचे माजी सदस्य राजेश महाडिक,प्रवीण महागावकर,रोहन यादव,योगेश चोगले,हर्षद खेडेकर, नितेश महाडिक,वैभव सारंगे, सुयोग महाडिक यांसह गावातील युवक यावेळी उपस्थित होते.

---

श्री.बडे सो

अर्जदाराचे वकील : ॲड.ज्योत्स्ना सो. कोळी

## जाहीर नोटीस

बेलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.३४१/२०२१

नि.नं.६

१) श्रीमती.विजया मोहन चव्हाण
वय : वर्षे, व्यव : नोकरी
२) श्रीमती.चद्रभागा बबन चव्हाण
वय : वर्षे, व्यव : शेती
३) श्री.ऋषिकेश मोहन चव्हाण
वय : वर्षे, व्यव : नोकरी
४) श्री.राहूल मोहन चव्हाण
वय : वर्षे, व्यव : नोकरी
१ ते ४ रा.अे ३०३ जानीमल टॉवर
सेक्टर १७ वाशी, नवी मुंबई — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात ज्यापेक्षा अर्जदार क्र.१ चे पती, २ चा मुलगा व ३ ते ४ यांचे वडील कै.मोहन बबन चव्हाण हे दिनांक ०४/१०/२०१७ रोजी, अे ३०३ जानीमल टॉवर सेक्टर १७ वाशी नवी मुंबई येथे राहत्या घरी मयत झाले आहेत.

मयत कै.मोहन बबन चव्हाण यांच्या नावे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**अ) मिळकतीचे वर्णन**

**दुकान नं.१२, २६३ स्क्वे.फूट, तळमजला, मोनालिसा अपार्टमेंट, प्लॉट क्र.८०, कोपरखैरणे, नवी मुंबई**

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

येणेप्रमाणे वारस दाखला मिळणे करिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै.मोहन बबन चव्हाण यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वासदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१७/०६/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, वाशी | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, वाशी

---

श्री.भाकरे सो.कोर्ट

ॲड.शेखर खोपकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.६५४/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.३०/०७/२०२१

१) श्री.मोहम्मद सलीम अब्दुल रज्जाक चिवणे
वय : ५८ वर्षे, धंदा : व्यापार
२) श्री.अब्दुल सलाम अब्दुल रज्जाक चिवणे
वय : ४८ वर्षे, धंदा : व्यापार
३) श्री.मोहम्मद अय्युब अब्दुल रज्जाक चिवणे
वय : ४१ वर्षे, धंदा : व्यापार
४) श्री.अब्दुल रऊफ अब्दुल रज्जाक चिवणे
वय : ४० वर्षे, धंदा : व्यापार
सर्व रा.तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई मयत खातूनबीबी अब्दुल रज्जाक चिवणे या दि.१४/१०/२०२० रोजी मयत झाल्या आहेत. मृत्यूसमयी मयत खातूनबीबी अब्दुल रज्जाक चिवणे यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

**(मिळकत क्र.१)**
**कैलाश कॉम्प्लेक्स, शॉप नं.१०, तळमजला, क्षेत्र २७९.७६ चौ.फूट कारपेट, आणि ९३.२५ लॉफ्ट एरिया, प्लॉट नं.३, सेक्टर ४ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

**(मिळकत क्र.२)**
**शॉप नं.१, तळमजला, क्षेत्र २१.३६ चौ.मी. बिल्टअप, प्लॉट नं.१५, सेक्टर ४ ई/ए, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

**(मिळकत क्र.३)**
**स्टॉल नं.२, तळमजला, सेक्टर नं.४ ई, क्षेत्र ११.५७ चौ.मी., कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

**(मिळकत क्र.४)**
**स्टॉल नं.८, सेक्टर नं.४ ई/ए, क्षेत्र ११.५७ चौ.मी., कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

**(मिळकत क्र.५)**
**शॉप नं.४, तळमजला, प्लॉट नं.३, सेक्टर नं.३५-I, ग्रीनफिल्ड रेसिडेन्सी, क्षेत्र १८५.६७९ चौ.फूट, ओवे-खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

अर्जदार यांनी सदरील चौकशी अर्ज मयत खातूनबीबी अब्दुल रज्जाक चिवणे यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभात वारस दाखला प्रदान करण्यात येईल हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.२५/०६/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मे.मुजावर सो.

अर्जदारातर्फे वकील
ॲड.संजय पाटकर
ॲड.वैशाली सुलेभाविकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.६१५/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.२९/०७/२०२१

१) श्रीमती.अनिता भिकाजी गोरे
वय : ४५, व्यव : गृहिणी
२) श्री.स्वप्नील भिकाजी गोरे
वय : २५, व्यवसाय : नोकरी
३) रोहन भिकाजी गोरे
वय : २१, व्यवसाय : नोकरी
सर्व रा.श्री.बालाजी हौ.सो., प्लॉट नं.७३ अ,
से.११, खारघर, नवी मुंबई
४) कु.सोनल भिकाजी गोरे
सौ.सोनल अनिरुद्ध पाटील ५२०/सी-३३,
गोदावरी हौ.सोसायटी, सेक्टर ५,
चारकोप कांदीवली वेस्ट, मुंबई — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील श्री.भिकाजी जातिबा गोरे, रा.फ्लॅट नं.सि ३०१, श्री.बालाजी को.ऑप. हौ.सो., प्लॉट नं.७३ ए, सेक्टर ११, खारघर, नवी मुंबई ४१०२१० हे दि.१४/०१/२०२१ रोजी निधन झाले. त्यांना अर्जदार हेच वारस आहेत. सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :

**मौजे : खारघर येथील सदनिका नं.सी ३०१, ''श्री.बालाजी को.ऑप.हौ.सोसायटी'', तिसरा मजला, प्लॉट नं.७३ ए, सेक्टर नं.११, मौजे : खारघर, नवी मुंबई**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नाहीत अशी कोणाची हरकत असल्यास आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात हजर होवून तक्रार दाखल करावी. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून जाहीर करतील व वारस दाखला देईल.

आज दि.२५ माहे जून सन २०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

सदरहू नोटीसची बजावणी ऑर्डर ५ रुल २० प्रमाणे करण्यात यावी.
मा.भाकरे साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील : ॲड.राकेश केणी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

रे.मु.नं.१२६/२०१९

नि.नं.५६/ड

ने.ता.०९/०८/२०२१

श्रीमती.काशिबाई उर्फ रुक्मिणीबाई विठ्ठल शेळके
वय : वर्षे, व्यव : गृहिणी
यांचे कुलमुखत्यारी श्री.तुकाराम विठ्ठल शेळके,
रा.पालीखुर्द, पो.चिखले, ता.पनवेल, जि.रायगड — वादी

विरुद्ध

श्री.शरद देहू पवार वै. — प्रतिवादी

प्रतिवादी
५) श्री.दिनेश सावळाराम पवार
वय : वर्षे, व्यव : धंदा
१०) श्रीमती.सिताबाई उर्फ जिजाबाई सावळाराम पवार
वय : वर्षे, व्यव : व्यापार
दोघेही रा.सांगडे, ता.पनवेल, जि.रायगड

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील वादी श्रीमती.काशिबाई उर्फ रुक्मिणीबाई विठ्ठल शेळके यांनी प्रतिवादी ५) श्री.दिनेश सावळाराम पवार, १०) श्रीमती.सिताबाई उर्फ जिजाबाई सावळाराम पवार यांच्या विरुद्ध खालील वर्णन केलेल्या मिळकतीबाबत दावा मिळकतीचे ठरावाकरिता वाटपाकरिता व निरंतर मनाई हुकूमाकरिता पनवेल येथील दिवाणी न्यायालय व स्तर या न्यायालयात दावा दाखल केलेला आहे.

**बिनशेती मिळकतीचे वर्णन**
**मौजे : सांगडे, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ७० | २/१ | ०-०६-३०<br>पो.ख. ०-०१-६० | ०.५२ |
| ७१ | १ | ०-१०-४०<br>पो.ख. ०-००-५० | १.९९ |
| ११५ | ० | ०-५१-१०<br>पो.ख. ०-०१-६० | ४.५६ |
| १४१ | ९ | ०-१५-२० | ०.३७ |
| १६५ | १/१ | ०-०३-००<br>पो.ख. ०-०१-३० | ०.०५ |
| १६५ | २ ब | ०-४८-३०<br>पो.ख. ०-००-५० | ७.७८ |
| १६५ | ३ | ०-३१-४०<br>पो.ख. ०-०१-०० | १.०६ |
| १७२ | १ | ०-०६-००<br>पो.ख. ०-००-८० | १.०० |
| १७३ | ० | ०-६०-२०<br>पो.ख. ०-०१-८० | ११.९४ |

येणेप्रमाणे मिळकतींचे वर्णन असे.

सदरहू दाव्याचा रे.मु.नं.१२६/२०१९ असा आहे. सदरहू रे.मु. नं.१२६/२०१९ या दाव्याकामी प्रतिवादी क्र.५ व १० यांस दाव्यात नमूद केलेल्या पत्यावर नोटीस/समन्स काढले असता सदर प्रतिवादी ५ व १० यांना समन्स/नोटीस बजाविलेल्याचा रिपोर्ट आज रोजी पर्यंत मे.कोर्टात आलेला नाही.

तरी सदर प्रतिवादी क्र.५ व १० यांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, सदर रे.मु.नं.१२६/२०१९ या दाव्याच्या सुनावणीची पुढील तारीख ९/०८/२०२१ अशी आहे. सदर तारखेस मे.कोर्टात या दाव्याकामी आपणास कोणत्याही प्रकारची हरत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत हजर न झाल्यास आपणास प्रतिवादी क्र.५ व १० या दाव्याच्या समन्स/नोटीसची बजावणी झाली असे गृहीत धरुन आपण प्रतिवादी क्र.५ व १० यांच्या विरुद्ध एकतर्फी दाव्या सुनावणीचा आदेश केला जाईल.

आज दि.२४ जून २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

राव साहेब

ॲड.अनिरुद्ध गो.तुळसणकर, पनवेल
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.६४८/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.२८/०७/२०२१

१) मो.सिराज मोहम्मद हुसैन पटेल
वय : ५७ वर्षे, धंदा : शेती
२) मोहम्मद इल्यास मोहम्मद हुसैन पटेल
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
३) म्हामुदमियॉ मोहम्मद हुसैन पटेल
वय : ४४ वर्षे, धंदा : शेती
क्रं.१ ते ३ रा.घर क्रं.१२६, अक्सा मजीद जवळ,
तळोजा पाचनंद, पो.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड
४) मोहसीना उमरमियॉ पटेल
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर क्रं.१४०, नॅशनल उर्दू स्कूलजवळ,
तळोजा पाचनंद, पो.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड
५) खुर्शीद आझीम नावडेकर
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर क्रं.३२०, नावडेकर हाऊस,
पाडा मोहल्ला, म्युनिसीपल ग्राऊंडजवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
६) रझिया मुखतार अहमद पटेल,
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर क्रं.११२, पटेल मोहल्ला, जामा मजिद समोर
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
७) हसिना यासीन पटेल
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा. घर क्रं.१५८, घटेला रोड,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड
८) शारबानू नसरुद्दीन सुबेदार
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर क्रं.१६३ बी, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांची आई पै.मैमुना मोहम्मद हुसेन पटेल या मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथे दि.१०/०२/२०२० रोजी पैगंबरवासी झाल्या आहेत. पै.मैमुना मोहम्मद हुसेन पटेल यांचे पती आणि अर्जदार यांचे वडील पै.मोहम्मद हुसेन महामुदमियॉ पटेल हे दि.२७/०३/२०१५ रोजी पैगंबरवासी झाले आहेत. पै.मैमुना मोहम्मद हुसेन पटेल व पै.मोहम्मद हुसेन महामुदमियॉ पटेल यांचे मृत्यूपश्चात त्यांना मुस्लीम कायद्यांतर्गत तरतुदींनुसार अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. मो.सिराज मोहम्मद हुसेन पटेल वगैरे ह्यांनी पै.मैमुना मोहम्मद हुसेन पटेल यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. पै.मैमुना मोहम्मद हुसेन पटेल यांचे पुर्वगामी कै.अब्दुल लतीफ कमरुद्दीन पटेल यांच्या नावे असलेल्या जमीन मिळकती ह्या नवी मुंबई प्रकल्पाकरिता भूसंपादनात झालेल्या होत्या व आहेत. सदरील भूसंपादीत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

| अनु. क्रं. | युनिट केस क्रं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | ओवे-४५९ | ४१२ | ० | १०-२८-० |
| २ | ओवे-४५९ | ३९९ | ४ | ०-०५-० |
| ३ | | ४०४ | १ अ | ०-२१-० |
| ४ | | ४०४ | ९ | ०-०३-१२ |
| ५ | | ४०४ | १० | ०-०२-४ |
| ६ | | ४०५ | १ | ०-१९-८ |
| ७ | | ४०६ | १ | ०-०२-० |
| ८ | | ४०७ | ० | १-१६-० |
| ९ | | ४०९ | २ | ०-२३-८ |
| १० | | ४०९ | ३ | ०-०१-० |
| ११ | | ४०९ | ५ | ०-०४-८ |
| १२ | | ४०९ | ६ | २-०९-० |
| १३ | | ४११ | ० | १-०७-१२ |
| १४ | | ४१३ | २ | ०-११-८ |
| १५ | | ४१४ | ० | ०-१९-० |
| १६ | | ४१५ | १ | ०-००-१२ |
| १७ | | ४१६ | २ | ०-०४-८ |
| १८ | | ४१६ | ६ | ०-०२-४ |
| १९ | | ४१७ | १ | ०-१६-८ |
| २० | | ४१७ | ९ | ०-०६-८ |
| २१ | | ४२१ | ७ | ०-०५-४ |
| २२ | | ४२३ | ६ | ०-२१-४ |
| २३ | | ४२४ | ७ | ०-१२-१२ |
| २४ | | ४२४ | ८ | ०-०५-४ |
| २५ | | ४२४ | ९ | ०-०३-१२ |
| २६ | | ४२७ | ४ | ०-०६-१२ |
| २७ | | ४३० | ८ | ०-०४-१२ |
| २८ | | ४३३ | ० | १-१९-० |
| २९ | | ४३४ | १ | २-०९-१२ |
| ३० | | ४३६ | अ | ४-०६-० |
| ३१ | | ४०८ | ० | ३-१९-० |
| ३२ | | ४१६ | ९ | १-२५-४ |
| ३३ | | ४२० | ० | १-१९-० |
| ३४ | | ४४८ | ० | ०-२३-४ |

पै.अब्दुल लतीफ कमरुउद्दीन पटेल यांचे मालकीच्या वर नमूद संपादीत मिळकतींचे मोबदल्यापोटी मे.सिडको लि., महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबवित असलेल्या १२.५ टक्के गांवठाण विस्तार योजनेंतर्गत वर नमूद भूसंपादनापोटी मौजे : खारघर नोड, येथे सेक्टर ३४ ए मध्ये भूखंड क्रं.४७, क्षेत्र ६५० चौ.मी. अशा वर्णनाचा भूखंड इरादीत झालेला आहे.

पै.मैमुना मोहम्मद हुसेन पटेल यांचे नावे असलेल्या जमीन मिळकती ह्या नवी मुंबई प्रकल्पाकरिता भूसंपादनात झालेल्या होत्या व आहेत. पै.मैमुना मोहम्मद हुसेन पटेल यांचे मालकीच्या नमूद संपादीत मिळकतींचे मोबदल्यापोटी मे.सिडको लि., महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबवित असलेल्या १२.५ टक्के गांवठाण विस्तार योजनेंतर्गत मौजे : खारघर नोड, येथे सेक्टर ३० मध्ये भूखंड क्रं.१९४, क्षेत्र २४९.८९ चौ.मी. आणि मौजे : खारघर नोड, येथे सेक्टर ३० मध्ये भूखंड क्रं.१९६, क्षेत्र १९९.६२ चौ.मी. अशा वर्णनाचे भूखंड वितरित करण्यात आलेले आहेत.

वर नमूद केल्याप्रमाणे पै.अब्दुल लतीफ कमरुद्दीन पटेल आणि पै.अमिनाबाई अब्दुल लतीफ पटेल यांचे मृत्यूपश्चात त्यांचे मालकीच्या मिळकतींमध्ये पै.मैमुना मोहम्मद हुसेन पटेल हिचा हिस्सा आहे.

वर मो.सिराज मोहम्मद हुसैन पटेल वगैरे हे पै.मैमुना मोहम्मद हुसेन पटेल यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट मो. सिराज मोहम्मद हुसैन पटेल वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर पै.मैमुना मोहम्मद हुसेन पटेल यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२५/०६/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

